# देहू नगरपंचायत कार्यालय ता.हवेली, जि.पुणे

Email: vdodehu@gmail.com

जा.क्र प्रशा./३६९१/२०२४-२५ दि. २४/०९/२०२४

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

यादवारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक ०७/१०/२०२४ रोजी दुपारी १२:३०** वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**नमूद 'अ' चे जोडपत्र**

**देहू नगरपंचायतीची सोमवार दिनांक ०७/१०/२०२४ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजाचे विषय.**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजुर करणे.

३) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ मधील तरतुदी प्रमाणे दि.३१.१२.२०२० पुर्वीचे अनधिकृत भुखंड व बांधकामे नियमाधीन करणेचे कार्यवाहीस मुदतवाढ देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

४) देहू नगरपंचायतीच्या सर्व्हे नंबर ९७ मधील सरकारी गायरानातील सध्याचे घनकचरा व्यवस्थापनाच्या जागेस कंपाऊंड करणे व त्या जागेमध्ये रस्त्याचे समोरील बाजूस १ कॅबीन तयार करून घेणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायतचा जुना ट्रॅक्टर क्रमांक MH-14 JE 2863 दुरूस्त करून घेणेबाबत तसेच शासनाकडून घनकचरा व्यवस्थापनांतर्गत प्राप्त ०२ ट्रॅक्टरसाठी ०२ ट्रॉली खरेदी करणेबाबत विचार विनींमय करून निर्णय घेणे.

६) देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीपात्रात अस्थी व राखेचे विसर्जन बंद करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

७) देहू नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.११ येथे भरणारा शुक्रावारचा आठवडे बाजार बंद करणेबाबत सौ.पौर्णिमा विशाल परदेशी, नगरसेविका देहू नगरपंचायत यांचे पत्रावर विचार विनीमय करून निर्णय घेणे

८) मौजे देहू सर्व्हे क्रमांक १४ मधील जमीन नवीन प्रस्तावीत पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल व इंटेकवेल साठी संपादित करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

९) नमामी चंद्रभागा अंतर्गत इंद्रायणी नदीघाट विकास करणेकरिता मौजे देहू सर्व्हे क्रमांक १३६ ते १३९ व सर्व्हे क्र.८ ते ९ येथील जमीन संपादित करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१०) वॉर्ड क्र.५ तळवडे हॉस्पीटल ते बायपास श्री.दिलीप संभाजी काळोखे यांचे घरापर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकण्याबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

११) वॉर्ड क्र.५ शुभारंभ पार्क सोसायटी मधील मुख्य व अंतर्गत रस्ते करणे व अंतर्गत भुमिगत केबल टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१२) वॉर्ड क्र.९ मधील साईनगरी सोसायटी, साईसृष्टी सोसायटी आणि चैतन्य पार्क सोसायटी येथे पाणीपुरवठा करणेसाठी एच.डी.बी. पाईप लाईन टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१३) परंडवाल चौक ते बोडकेवाडी पंपिंग हाऊस पर्यंत MSEB ला सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देणे व जलशुध्दीकरण केंद्राला स्वतंत्र केबल लाईन टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१४) महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील महिला व मुलींसाठी Self Defence चा क्लास सुरू करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१५) महिला व बालकल्याण समिती अंतर्गत आईसक्रीम आणि केक, ज्वेलरी तयार करणे तसेच इतर विषयांचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१६) प्रभाग क्र.३ सर्व्हे नं.९७ मध्ये मुलांसाठी ओपन जिम साहित्य देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१७) वॉर्ड क्र.१७ येथील मेन रोड ते श्री.नंदकुमार टिळेकर यांच्या घरापर्यंत सिमेंटचा रस्ता करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१८) वॉर्ड क्र.१७ मधील श्रीकृष्ण मंदीरासमोरील नगरपंचायतची जागा ताब्यात घेऊन पाण्याची टाकी बांधणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

१९) वॉर्ड क्र.१७ मध्ये तयार करणेत आलेले सिमेंटचे रस्ते यामध्ये सोडलेल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२०) माळीनगर मेन रोडला लागून असलेल्या जागेत रोडच्या साईडला फुटपाथ बनविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२१) माळीनगर मधील मेन बस स्टॉप समोरील रस्त्याला श्री.बळवंत रावजी टिळेकर, माजी सरपंच यांचे नाव देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२२) परंडवाल चौक ते काळोखे चौक पाण्याची लाईन टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२३) STP पंपींग हाऊससाठी यंत्रसामुग्री खरेदी करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२४) वॉर्ड क्र.७ येथे वाचनालय सुरू करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२५) वॉर्ड क्र.१५,१६, १७ माळीनगरमध्ये प्रवेशव्दारचे विविध ठिकाणी कमानी उभारण्यात विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२६) वॉर्ड क्र.६ मध्ये नवीन पाण्याची लाईल आणि ड्रेनेज टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२७) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये फटाके स्टॉल लावणेसाठी विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२८) प्रभाग क्र.१२ मधील मंदीरालगत बाजार आळीमधील पालखी सोहळा, बीज सोहळा आणि कार्तिकी सोहळा या निमित्ताने होणारी गर्दी पहाता येण्या- जाण्याकरिता एकच रस्ता असल्यामुळे दुसरे जुने दोन रस्ते आहेत त्यास मंजूरी देण्याबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

२९) प्रभाग क्र.१२ मधील तीर्थक्षेत्र विकास आराखडयातध्ये झालेल्या विकास कामांमधील लाईटच्या केबल, ड्रेनेज पाईप, पिण्याचे पाण्याची लाईन अत्येत दुरावस्था झाली असलेमुळे नवीन लाईन टाकणेकरिता मंजूरी देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३०) वॉर्ड क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी चौकात सुशोभिकरण करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३१) देहू नगरपंचायत आस्थापनेवर समावेशन न झालेल्या ग्रामपंचायत कालीन कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचे वेतन वाढविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३२) १५ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त बंधनकारक अनुदान निधी/ नगरपंचायत निधी मधून देहू शहरामधील पाणीपुरवठा योजनेअंतर्गत स्लुईस व्हॉल्व (Sluice Valves) बदलणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

३३) देहू नगरपंचायत लेखा विभागासाठी सन २०२३-२४ व २०२४-२५ करिता नगरपंचायत व्दारे भरण्यात येणारे कराचे विवरणपत्रे (IT, GST, PT, PF, Etc Tax Returns) भरणेकरिता सनदी लेखापाल फर्मला मुदतवाढ देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३४) देहू नगरपंचायत लेखा विभागासाठी सन २०२४-२४ करिता उपार्जित तत्वावर दुहेरी लेखा नोंद पध्दतीने लेखे तयार करणेकरिता सनदी लेखापाल फर्मला कार्योत्तर मंजूरी देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३५) देहू नगरपंचायत लेखा विभागासाठी सन २०२४-२५ करिता उपार्जित तत्वावर दुहेरी लेखा नोंद पध्दतीने लेखे तयार करणेकरिता सनदी लेखापाल फर्मची नियुक्ती करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३६) देहू नगरपंचायत दुहेरी लेखा नोंद पध्दतीने तयार करणेत आलेल्या वार्षिक लेख्यांना मान्यता देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३७) वॉर्ड क्र.३ श्री.सुनिल धुमाळ घर ते श्री.महादेव कांबळे यांच्या घरापर्यंत पिण्याचे पाण्याची लाईन टाकणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३८) देहू नगरपंचायत कार्यालय व माळीनगर जिल्हा परिषद शाळेजवळील RO फिल्टर प्लँट तसेच वैकुंठ रथ नगरपंचायतच्या ताब्यात घेणेबाबत संत तुकोबाराय चैतन्य विकास समिती, श्रीक्षेत्र देहू यांचे पत्रावर विचार विनीमय करून निर्णय घेणे.

३९) बोडकेवाडी येथील सद्यस्थितीतील चालू ३.५ एम.एल.डी. व जुना दुरूस्त केलेला १.५ एम.एल.डी.जलशुध्दीकरण प्रकल्प एकत्रित कार्यान्वयीत करण्यासाठी विविध विद्युत (इलेक्ट्रीकल) कामे करणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

४०) बोडकेवाडी येथील जुना दुरूस्त केलेल्या १.५ एम.एल.डी जलशुध्दीकरण प्रकल्प जॅकवेलला जोडण्यासाठी विविध पाईपलाईन /वॉल तसेच नवीन क्लोरीनेटर (Chlorinator) बसविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

४१) वॉर्ड क्र.१३ महालक्ष्मी मंदीराचे महादेव पिंडीचे बाजूस फरशी बसविणे व इतर कामे करणेस मंजूरी देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

४२) वॉर्ड क्र.१३ मधील विविध ठिकाणचे रस्त्यांचे दोन्ही बाजूस सोडलेल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

सौ.पूजा दिवटे
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत, देहू

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा देहू, अध्यक्षा साहेब .नगरपंचायत कार्यालय ,देहू
यांजकडे......

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०२
ठराव क्रमांक :- ०२

विषय क्र. २ :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्र. २. :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सुचक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण.

अनुमोदक :- श्री.योगेश बा.परंडवाल .

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा | विषय क्रमांक :- ०१

दिनांक :- ०७/१०/२०२४ | ठराव क्रमांक :- ०१

विषय क्र. १ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र. १ :-सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनिमय करण्यात आला. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आला.

सुचक :- सौ.मीना राहुल कुन्हाडे. अनुमोदक :- सौ.शितल अनिल हगवणे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षी, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचयत,देहू जि.पुणे

सभा विभाग

सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०३

दि. ०७/१०/२०२४

विषय :- महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ मधील तरतुदीप्रमाणे दि.३१.१२.२०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड व बांधकाम नियमाधीन करणेचे कार्यवाहीस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव :- देहू नगरपंचायत सर्वसाधारण सभा,ठराव क्र.११ दि. १७/०१/२०२४ नुसार महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ मधील तरतुदीप्रमाणे दि.३१.१२.२०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड व बांधकाम नियमाधीन करणेचे कार्यवाहीस मंजुरी देणेत आलेली होती तसेच सदरची कार्यवाही करिता नागरिकांना दि.२८.०७.२०२४ पूर्वी अर्ज सादर करणेकरिता मुदत देणेत आलेली होती.

परंतु सदरची कार्यवाही करणेकरिता आवश्यक असेलेल कागदपत्रे जमा करणेकरिता सदरचा कालावधी कमी असल्याने सदर कालावधी वाढविणेबाबत सभेमध्ये चर्चा करणेत आली.यावेळी सदर बाबींवर विचार विनिमय होऊन दि.३१.०७.२०२५ पर्यंत महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ अंतर्गत प्रस्ताव सादर करणेकरिता सभेमार्फत मंजुरी देणेत आली.तसेच याकामी येणाऱ्या खर्चास सभेमार्फत मंजुरी देणेत आली.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत स्थापना सन 2020 ता. हवेली, जि. पुणे

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०४
दि. ०७/१०/२०२४

विषय :- देहू नगरपंचायत सर्व्हे क्र.९७ मधील सरकारी गायरानातील सध्याचे घनकचरा व्यवस्थापनाच्या जागेस कंपाऊंड करणे व त्या जागेमध्ये रस्त्याचे समोरील बाजूस ०१ कॅबीन तयार करणेबाबत.

ठराव :- देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे विठ्ठलनगर मधील सर्व्हे क्र.९७ चे सरकारी गायरानाचे जागेस यापुर्वी केवळ रस्त्याचे बाजूने पत्र्याचे कंपाऊंड बांधणेत आलेले होते,परंतु अतिवृष्टी व वादळ वारे यामुळे सदरचे पत्रे हे मोडकळीस आले व अनेक ठिकाणी वाकले तसेच ते तुटून वेगळे झाले आहेत.

सदरचे घनकचरा व्यवस्थापनाचे जागेत अनेकदा विनापरवानगी बाहेरील गाड्या कचरा खाली करत असल्याचे निदर्शनास आले आहे.तसेच अज्ञात व्यक्तींकडून कचऱ्यास आग लागणेचे घटना यापूर्वी घडल्या आहेत.सदर बाबींवर सभेमध्ये चर्चा करणेत आली.यावेळी सदर घनकचरा व्यवस्थापनाचे जागेस कंपाऊंड बांधणे,कॅबीन तयार करणे व लोखंडी पक्के गेट बसविण्यास मंजुरी देणेत आली.तसेच कचऱ्यास आग लागल्यास ती विझविणे याकरिता सदर ठिकाणी १५,००० लिटर ची पाण्याची टाकी बांधणे व त्याकरिता पाण्याची लाईन व उच्च क्षमतेचा पंप घेणे व सदर ठिकाणी पावसाचे पाण्याचा योग्य निचरा होणेकरिता आवश्यक ठिकाणी सिमेंट पाईप टाकणे याकरिता सभेमार्फत मंजुरी देणेत आली.वरील कामाकरिता येणाऱ्या खर्चास सभेमार्फत मंजुरी देणेत आली.

तसेच यावेळी देहू नगरपंचायत हद्दी बाहेरील कचरा सदरचे घनकचरा व्यवस्थापनाच्या जागेत खाली करताना आढळून आल्यास संबंधित व्यक्ती यांवर रु.५,०००/- इतका दंड लावण्यात यावा तसेच संबंधित व्यक्तींकडून सदरची बाहेरील कचरा खाली करणेची घटना पुनश्च घडल्यास संबंधित व्यक्तीस रु.१०,०००/- इतका दंड लावणेत यावा.सदरचा दंड नगरपंचायत कार्यालयास जमा करे पर्यंत संबंधित वाहन नगरपंचायतचे ताब्यात ठेवण्यात यावे व दंडाचा भरणा नाही केल्यास संबंधित वाहन पोलीस स्टेशन चे ताब्यात देण्यात यावे.असे निर्देश मे.सभेमार्फत देण्यात आले.

सुचक:- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

अनुमोदक:- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत
स्थापना
सन २०२०
ता. हवेली, जि. पुणे

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०५
दि. ०७/१०/२०२४

विषय :- देहू नगरपंचायत चा जुना ट्रॅक्टर क्रमांक MH१४ JE २८६३ दुरुस्त करणे तसेच शासनाकडून घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत प्राप्त ०२ ट्रॅक्टर करिता ०२ ट्रोली खरेदी करणेबाबत.

ठराव :- देहू नगरपंचायत कार्यालयाकडे MH१४ JE २८६३ या क्रमांकाचा ट्रॅक्टर उपलब्ध आहे.परंतु सदर ट्रॅक्टर मध्ये काही बिघाड झाला असल्याने सदरचा ट्रॅक्टर खूप कालावधी पासून विनावापर बंद पडून आहे.विनावापर ट्रॅक्टर उभा असल्याने भविष्यात सदरचे ट्रॅक्टर मध्ये अन्य बिघाड निर्माण होऊन ट्रॅक्टर खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यावेळी सभेमध्ये सदर बाबीवर चर्चा करणेत आली आणि सदरचा ट्रॅक्टर दुरुस्त करणेस मंजुरी देणेत आली.तसेच शासनामार्फत प्राप्त इतर ०२ लहान ट्रॅक्टर करिता ट्रोली विकत घेणेस मंजुरी देणेत आली.

सुचक:- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०६
दि. ०७/१०/२०२४

विषय :- देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीपात्रात अस्थी व राखेचे विसर्जन बंद करणेबाबत.

ठराव :- देहू नगरपंचायत हद्दीत इंद्रायणी नदी पात्रात मोठ्याप्रमाणात अस्थी व राखेचे विसर्जन केले जाते.इंद्रायणी नदी पत्रावर देहू शहरास पाणीपुरोवठा करणे करिता नवीन जल शुद्धीकरण प्रकल्प व नवीन पाणीपुरोवठा योजना प्रस्तावित करणेत आलेली आहे.सदरचे अस्थी व राख यामुळे इंद्रायणी नदीचे प्रदूषण होत असून नदी पात्रातील मासे यावर त्याचा दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सदरचे अस्थी व राख यामुळे भविष्यात पिण्यासाठी जल शुद्धीकरण प्रक्रिया यावरील ताण वाढणार आहे.

सदर विषयाबाबत सभेमध्ये सांगोपांग चर्चा करणेत आली.भविष्यातील प्रस्तावित जल शुद्धीकरण प्रकल्पावरील ताण कमी करणे तसेच लोकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरोवठा करणे याकरिता अस्थी व राखेचे विसर्जन बंद करणेस मंजुरी देणेत आली.तसेच सदर ठिकाणी प्रतिकात्मक स्वरुपात राखेचे विसर्जन कलश उभारणेस मंजुरी देणेत आली.सदरचे कलश मधील राख व अस्थी यांचे जमिनी मध्ये विसर्जन करून त्यावर झाड लावणेच्या सूचना देणेत आल्या.याकामी येणाऱ्या खर्चास नगरपंचायत मार्फत मंजुरी देणेत आली.

सुचक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन 2020 ★ ता. हवेली, जि. पुणे

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०७
दि. ०७/१०/२०२४

विषय :- देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक ११ येथे भरणारा शुक्रवार चा आठवडे बाजार बंद करणेबाबत

ठराव :- देहू नगरपंचायत हद्दीत आठवडेतील दर मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी आठवडे बाजार भरत असतो.सदरचे आठवडे बाजार हे प्रामुख्याने देहू गावठाण व गावठाणाला लागून मुख्य रस्ता व सभोवताली भरत असतो.सदर गावठाणामध्ये मुख्य रस्त्यास लागून प्राथमिक आरोग्य केंद्र,तलाठी व मंडळअधिकारी कार्यालय तसेच जगद्गुरु श्री. संत तुकाराम महाराज मंदिर आहे.

देहू शहरात डेंगू ,टायफोईड तसेच गोचीडतापाचे रुग्ण वाढत आहे.गावठाणामध्ये रुग्णांचे प्रमाण जास्त आहे.असे रुग्ण यांना आठवडे बाजाराचे दिवशी रुग्णालयात घेऊन जाणे कठीण होते.गावठाणामध्ये अत्यंत गर्दी करून आठवडे बाजाराकरिता दुकाने रस्त्यावर उभारली जातात.त्यामुळे सदरचे रस्त्याने चालणे देखील कठीण होऊन जाते.आठवडे बाजाराचे काळात सदर भागात राहणारे रहिवाशी यांना त्यांचे दुचाकी तसेच इतर वाहने बाहेर काढता येत नाहीत.वाहने बाहेर काढता येत नसल्याने आप्त्कालीन परिस्थितीमध्ये वायोवृद्ध नागरिक तसेच रुग्ण यांना दवाखाणे किंवा रुग्णालयात घेऊन जाणे तसेच आवश्यकता भासल्यास आग्निशमन वाहन सदर परिसरात घेऊन जाणे अशक्य होऊन जाते. सदरचे आठवडे बाजार हा सकाळी ९ वाजले पासून सुरु होऊन तो बंद करून बाजारातील दुकाने आवरून रस्ते मोकळे करण्यास रात्री चे १० वाजतात . याकालावधीत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात काचरा निर्माण होतो व दुकाने रात्री उशिरा पर्यंत चालू राहत असल्याने रस्ते साफ करण्यास उशीर होतो.त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते.

सर्व शहरांमध्ये आठवडे बाजार हा आठवड्यातून एक दिवस भरतो परंतु देहू मध्ये आठवडे बाजार हा आठवडे मध्ये दोन दिवस ( मंगळवार व शुक्रवार ) भरतो. त्यामुळे आठवडे बाजाराचे परिसरातील नागरिकांना खूप समस्यांना सामोरे जावे लागते.त्यामुळे आपण शुक्रवार चा आठवडे बाजार बंद करून केवळ मंगळवार चा आठवडे बाजार भरवावा तसेच आठवडे बाजार चा कालावधी सकाळी ११ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत ठेवणेत यावा,अशा प्रकारची विनंती सौ.पोर्णिमा विशाल परदेशी,नगरसेविका,देहू नगरपंचायत यांचे मार्फत करणेत आलेली होती.

वरील सर्व बाबींवर सभेमध्ये चर्चा करणेत आली व आठवडे बाजार बंद करणेस बहुमताने नकार देणेत आला.आठवडे बाजार हा दर मंगळवार व शुक्रवारी सकाळी ९:०० ते सायंकाळी ०७:३० या कालावधीत भरविला जाईल असे ठरले.तसेच सायंकाळी ७:३० नंतर बाजार बंद केला नाही तर असे व्यापारी व शेतकरी यांचेवर रु.३००/- इतका दंड आकारणेत यावा असे ठरले.तसेच शासन धोरणानुसार प्लास्टिक बंदी बाबत आवश्यक दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात मे.सभेमार्फत देण्यात आल्या.

सुचक:- सौ.पोर्णिमा विशाल परदेशी

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव बहुमताने मंजूर

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

देहू नगरपंचायत
स्थापना सन २०२०
ता. हवेली, जि. पुणे

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०८
दि. ०७/१०/२०२४

विषय :- मौजे देहू सर्व्हे क्र.१४ मधील जमीन नवीन प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल व इन्टेकवेल साठी संपादित करणेबाबत.

ठराव :- देहू नगरपंचायत हद्दीतील क्षेत्राकरिता वाढत असलेली लोकसंख्या व सदर लोकसंख्येची पिण्याच्या पाण्याची गरज भागविणे करिता नवीन पाणी योजना व त्या अंतर्गत मौजे देहू मधील सर्व्हे क्र.१४ येथे नवीन जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता जॅकवेल व इन्टेकवेल प्रस्तावित आहे. सदर ठिकाणी जॅकवेल व इन्टेकवेल ची उभारणी करणेकरिता सदरचे मौजे देहू मधील सर्व्हे क्र.१४ तसेच आवश्यकता पडल्यास मौजे देहू सर्व्हे क्र.१३ मधील जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

यावेळी सभे मार्फत सदरचे क्षेत्र हे संपादित करणे करिता मंजुरी देणेत आली.तसेच सदरचे भूसंपादन Transferable Development Rights या पद्धतीने अथवा शासन मार्फत प्राप्त होणारे निधी मधून करणेबाबत सूचना देणेत आल्या.याकामी येणाऱ्या खर्चास सभेमार्फत मंजुरी देणेत आली.

सुचक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे — अनुमोदक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२४-२५ ठराव क्र. ०९
दि. ०७/१०/२०२४

विषय :- नमामी चंद्रभागा अंतर्गत इंद्रायणी नदी घाट विकास करणे करिता मौजे देहू सर्व्हे क्र.१३६ ते १३९ व सर्व्हे क्र.०८ ते ०९ येथील जमीन संपादित करणेबाबत.

ठराव :- नमामी चंद्रभागा या शासन योजने अंतर्गत इंद्रायणी नदी घाट विकसित करणेकरिता निधी उपलब्ध होणार आहे.सदर योजने मौजे देहू मधील सर्व्हे क्र.१३६ ते १३९ व सर्व्हे ०८ ते ०९ यामधील नदी घाटाचे क्षेत्र विकसित करणेत येणार आहे.सदर घाट विकसित करणेकरिता वरीलप्रमाणे मौजे देहू सर्व्हे क्र.१३६ ते १३९ व सर्व्हे क्र.०८ ते ०९ मधील क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

यावेळी सभे मार्फत सदरचे क्षेत्र हे संपादित करणे करिता मंजुरी देणेत आली.तसेच सदरचे भूसंपादन Transferable Development Rights या पद्धतीने अथवा शासन मार्फत प्राप्त होणारे निधी मधून करणेबाबत सूचना देणेत आल्या.याकामी येणाऱ्या खर्चास सभेमार्फत मंजुरी देणेत आली.

सुचक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

अनुमोदक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत, ता. हवेली, जि. पुणे ★ स्थापना सन २०२० ★

(सौ.पूजा अ. दिवटे)
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

**देहू नगरपंचायत**
**मा. सर्वसाधारण सभा**

**विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.५ तळवडे हॉस्पिटल ते बायपास श्र.दिलीप संभाजी काळोखे यांचे घरापर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**विषय क्रमांक -१०** **ठराव क्रमांक – १०**
**दिनांक -०७/१०/२०२४**

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत. वार्ड क्र.५ श्री. तळवडे हॉस्पिटल बायपास रोडपासून ते श्री.दिलीप संभाजी काळोखे या भागात पाहणी केली असता पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. वार्ड क्र.५या भागातील तक्रारी जास्त असून सदर ठिकाणच्या सदरील कामे करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सूचक :श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण
अनूमोदक : श्री योगेश हमुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- ११
ठराव क्र.११

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— वॉर्ड क्र २ शुभारंभ पार्क सोसायटी मधील मुख्य व अंतर्गत रस्ते करणे व अंतर्गत भुमिगत केबल टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम शासनाच्या / वैशिष्टपुर्ण योजना / जिल्हा नगरोत्थान योजना / अथवा इतर शासकीय निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ रसिका काळोखे
सुचक

श्री मयुर शिवशरण
अनुमोदक

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक -१२ ठराव क्रमांक – १२
दिनांक -०७/१०/२०२४

**विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.९ मधील साईनगरी सोसायटी, साईसृष्टी सोसायटी आणि चैतन्य पार्क सोसायटी येथे पाणीपुरवठा करणेसाठी एच.डी.बी पाईप लाईन टाकण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

देहू नगरपंचायत हद्दीचे मोठ्या प्रमाणात विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत.वार्ड क्र.९ मधील साईनगरी सोसायटी, साईसृष्टी सोसायटी आणि चैतन्यपार्क सोसायटी या भागात पाहणी केली असताया भागात पिण्याच्या पाण्याची एच.डी.बी पाईपलाईनटाकणेगरजेचे आहे. वार्ड क्र.९ या भागातील तक्रारी जास्त असून सदर ठिकाणच्या सदरील कामे करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सूचक :श्री योगेश हमुमंत काळोखे
अनूमोदक :श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

Pawar
ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक -१३ ठराव क्रमांक – १३
दिनांक -०७/१०/२०२४

विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक ते बोडकेवाडी पंपिंग हौस पर्यंत MSEB ला सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देणे व जलशुद्धीकरणकेंद्राला स्वतंत्र केबल लाईन टाकणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सदर ठिकाणच्या सदरील कामे करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सूचक :श्री प्रवीण रामदास काळोखे
अनूमोदक :श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत, देहू
## सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक :- १४ | ठराव क्रमांक :- १४

दिनांक :- ०७/१०/२०२४ | दिनांक :- ०७/१०/२०२४

विषय क्र. १४ :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील महिला व मुलींसाठी सेल्फ डिफेंस (Self Defence) चा क्लास सुरू करणेस मंजूरी देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १४ :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

राज्यातील नागरी भागांचे वेगाने होत असलेल्या विस्तारामुळे अनेक कुटूंबे शहराचे मुख्य ठिकाणापासून दुरवर रहात आहेत. तसेच मा.शासनाचे महिला सक्षमीकरण धोरणामुळे कुटूंबातील मुलींना शिक्षण देण्याचे प्रमाण वाढल्यामुळे सुशिक्षित महिला आर्थिक दृष्टया स्वनिर्भर होत असून रोजगार करत असलेमुळे त्यांना दैनंदिन प्रवास करावा लागतो. तसेच मुलींचे शिक्षणासाठी राबविण्यात येत असलेल्या शासन धोरणामुळे मुलींचे शिक्षणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे मुलींना शिक्षणासाठी दैनंदिन प्रवास करवा लागतो. तसेच राज्यात वाढलेल्या औद्योगिकरणामुळे परप्रांतीय लोकांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे नागरी भागांमधील अनुचित घटनांमध्ये वाढ झाली असून महिला व मुली बळी पडत आहेत. त्यामुळे महिला व मुली यांना स्वता:ची सुरक्षा स्वत: करणे आवश्यक झाले असून त्याकरिता देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील महिला व मुलींसाठी सेल्फ डिफेंस (Self Defence) चे प्रशिक्षण (क्लास) सुरू करणेबाबत चर्चा करणेत आली.

शहरातील महिला व मुलींना अपातकालीन परिस्थितीत स्वताचे संरक्षण कसे करावे याकरिता प्रशिक्षण देणे आवश्यक असून शहरातील विविध प्रभागांमध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करून महिला व मुलींना निर्भय होणेस मदत होणार आहे. अशा प्रकारची चर्चा होउन त्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पुजा सु.काळोखे

अनुमोदक :- श्री.मयुर द.शिवशरण.

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक ०७/१०/२०२४

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत, देहू

## सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक :- १५ | ठराव क्रमांक :- १५

दिनांक :- ०७/१०/२०२४ | दिनांक :- ०७/१०/२०२४

विषय क्र. १५ :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत आईसक्रीम आणी केक, ज्वेलरी तयार करणे तसेच इतर विषयांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेस मंजूरी देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १५ :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

मा.शासनाचे महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत महिलांना आर्थिक पाठबळ तयार होण्यासाठी तसेच त्या स्वताच्या पायावर खंबीरपणे उभ्या रहाण्यासाठी विविध प्रकारच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असते. त्यासाठी देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती अंतर्गत महिलांना आईसक्रीम आणी केक, ज्वेलरी तयार करणे तसेच माहिलांच्या मागणीनुसार इतर विषयांचे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्यास त्याचा फायदा महिलांना होईल. अशा प्रकारची चर्चा होउन त्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पुजा सु.काळोखे

अनुमोदक :- श्री.मयुर द.शिवशरण.

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक ११/०७/२०२४

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- १६
ठराव क्र.१६

**विषय— वॉर्ड क्र ३ सर्व्हे नं १७ मध्ये मुलांसाठी ओपन जीम साहीत्य देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## <u>ठराव</u>

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम शासनाच्या अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना / वैशिष्टपुर्ण योजना / जिल्हा नगरोत्थान योजना / अथवा इतर शासकीय निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

श्री मयुर शिवशरण
सुचक

सौ. रसिका काळोखे
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

देहु नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- १७
ठराव क्र.१७

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— वॉर्ड क्र १७ येथील मेन रोड ते नंदकुमार टिळेकर यांच्या घरापर्यंत सिमेंटचा रस्ता करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम शासनाच्या वैशिष्टपुर्ण योजना / जिल्हा नगरोत्थान योजना / अथवा इतर शासकीय निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ ज्योती टिळेकर
सुचक

श्री योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

देहु नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- १८
ठराव क्र.१८

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— वॉर्ड क्र १७ मधील श्री कृष्ण मंदीरासमोरील नगरपंचायतीची जागा ताब्यात घेऊन पाण्याची टाकी बांधणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम शासनाच्या वैशिष्टपुर्ण योजना / जिल्हा नगरोत्थान योजना / अथवा इतर शासकीय निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ ज्योती टिळेकर
सुचक

श्री सुधीर काळोखे
अनुमोदक

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- १९
ठराव क्र.१९

**विषय—   वॉर्ड क्र १७ मध्ये तयार करणेत आलेले सिमेंटचे रस्ते यामध्ये सोडलेल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम नगरपंचायत / विकास निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ ज्योती टिळेकर
सुचक

श्री योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

देहु नगरपंचायत * स्थापना सन २०२० * ता. हवेली, जि. पुणे

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- २०
ठराव क्र.२०

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— माळीनगर मध्ये मेन रोडला लागून असलेल्या जागेत रोडच्या साईडला फुटपाथ बनविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

## ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, स्थानीक नागरीक यांनी लोकप्रतिनीधी यांचेकडे काम करण्याबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. सन्मानीय सदस्य यांनी असे मत मांडले की, सदरहू काम केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे त्यामुळे सदरचे काम तातडीने करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. हे काम शासनाच्या वैशिष्टपुर्ण योजना / जिल्हा नगरोत्थान योजना / अथवा इतर शासकीय निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सौ ज्योती टिळेकर
सुचक

श्री योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्ष
**देहु नगरपंचायत देहु**

देहु नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०७/१०/२०२४
विषय क्रमांक :- २१
ठराव क्र.२१

**विषय— माळीनगर मधील मेन बसस्टॉप समोरील रस्ताला श्री बळंवत रावजी टिळेकर माजी सरपंच यांचे नाव देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**<u>ठराव</u>**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, सौ ज्योती टिळेकर यांनी माळीनगर येथील मेन बस स्टॉप समोरील रस्ताचा सन्मानीय सदस्य श्री बळवंत रावजी टिळेकर माजी सरपंच नाव देणेबाबत सभागृहात मागणी केली सभागृहात सन्मानीय सदस्य श्री योगेश परंडवाल यांनी सदर रस्ताला नाव देणेपुर्वी यावर सविस्तर चर्चा करण्यात यावी अशी मागणी केली यावर सदस्यांनी प्रभाग १५,१६,१७ मधील तिन्ही नगरसेवकांनी सविस्तर चर्चा करुन एकमत झाल्यास यावर निर्णय देण्यात येईल असे सांगितले याप्रमाणे सभागृहात अंतिम निर्णय झाला.

सौ ज्योती टिळेकर
सुचक

श्री योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

देहु नगरपंचायत ★ स्थापना सन 2020 ता. हवेली, जि. पुणे ★

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक -२२
दिनांक -०७/१०/२०२४

ठराव क्रमांक – २२

**विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक ते काळोखे चौक पाण्याची पाईप लाईन टाकण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

